**भाग 'अ'**

| धाराशिव येथील जलदगती विशेष नयायालय यांचे न्यायालयात<br>(पिठासीन अधिकारी एस.जी. ठुबे)<br>निकालाचा दिनांक – १६.०७.२०२६<br>निशाणी – | |
|---|---|
| फिर्यादी / तक्रारदार | महाराष्ट्र शासन मार्फत<br>पोलीस निरीक्षक,<br>धाराशिव शहर पोलीस स्टेशन, धाराशिव |
| अभियोग पक्षातर्फे | सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एन.वाय.साबळे |
| आरोपी | संजय रविंद्र चव्हाण |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | श्री. वाय. डी. खैरे |

**भाग 'ब'**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | सप्टेंबर २०२० व दिनांक ०९.१२.२०२० |
| फिर्याद दाखल दिनांक | ०९.१२.२०२० |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | ०१.०२.२०२१ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | २५.११.२०२१ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २५.०३.२०२२ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | १६.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | -- |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संजय रविंद्र चव्हाण | ११.१२.२० | २९.१२.२१ | भा.दं.वि. कलम ३६३, ३६६ (अ), ३७६, ३७६ (२), ३७६ (३) आणि बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कलम ६, १० | निर्दोष सोडले | -- | ११.१२.२० ते २९.१२.२१ आणि २३.०६.२६ ते आजपर्यंत |

## भाग 'क'

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार / न्यायालयीन साक्षीदार

अ. अभियोग पक्ष

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | एकनाथ बबन कोंढवळे | घटनास्थळ/जप्ती पंच | ३५ |
| २ | अबक | पिडीता | ३८ |
| ३ | विश्वास विलासराव वायचळ | घटनास्थळ/जप्ती पंच | ४६ |
| ४ | फिर्यादी | पिडीतेची आई | ५० |
| ५ | डॉ. श्रीकांत बब्रुवान बलवंडे | वैद्यकीय अधिकारी | ५५ |
| ६ | डॉ. सोनाली विलासराव पाटील | वैद्यकीय अधिकारी | ५८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | साहेबराव शहाजीराव देशमुख | मुख्याध्यापक | ६८ |
| ८ | अनिल देवेंद्र चव्हाण | वैद्यकीय अधिकारी | ७७ |
| ९ | प्रदिपकुमार अरुण गोरे | मुख्याध्यापक | ८३ |
| १० | आप्पासाहेब कर्नासाहेब जावळे | जप्ती पंच | ९० |
| ११ | ज्ञानेश्वर आसाराम गोरे | पोलीस कर्मचारी | ९४ |
| १२ | अमरसिंह श्रीकांतराव गोरे | मुख्याध्यापक | ९९ |
| १३ | गितांजली संदिप जोशी | साक्षीदार | ११४ |
| १४ | इरफान बशीर शेख | साक्षीदार | १२२ |
| १५ | शंकर मधुकर सुर्वे | तपासी अधिकारी | १२९ |

ब. आरोपी पक्ष

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

क. न्यायालयीन साक्षीदार

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निशाणी ३७/सा.क्र.१ | घटनास्थळ / जप्ती पंचनामा |
| २ | निशाणी ३९/सा.क्र.२ | पिडीतेचा जबाब |
| ३ | निशाणी ४७/सा.क्र.३ | घटनास्थळ पंचनामा |
| ४ | निशाणी ४८/सा.क्र.३ | आरोपीचे कपडे जप्ती पंचनामा |
| ५ | निशाणी ५१/सा.क्र.४ | फिर्याद |
| ६ | निशाणी ५७/सा.क्र.५ | आरोपीचे वैद्यकीय प्रमाणपत्र |

| | | |
|---|---|---|
| ७ | निशाणी ६२/सा.क्र.६ | पिडीतेचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ८ | निशाणी ६३/सा.क्र.६ | पिडीतेच्या वयाबाबतचा अहवाल |
| ९ | निशाणी ७१/सा.क्र.७ | शाळा सोडल्याचा दाखला |
| १० | निशाणी ७२/सा.क्र.७ | जनरल रजिस्टरची नोंद |
| ११ | निशाणी ७३/सा.क्र.७ | विद्यार्थी प्रवेश पंचिका तक्ता |
| १२ | निशाणी ७४/सा.क्र.७ | शाळा सोडल्याचा दाखला |
| १३ | निशाणी ७८/सा.क्र.८ | पिडीतेच्या वयाबाबतचा अहवाल |
| १४ | निशाणी ८४/सा.क्र.९ | पिडीतेच्या प्रवेश अर्जाची प्रत |
| १५ | निशाणी ८५/सा.क्र.९ | पिडीतेचा शाळा सोडल्याचा दाखला |
| १६ | निशाणी ८६/सा.क्र.९ | पिउीतेचा प्रवेश निर्गम उतारा |
| १७ | निशाणी ८७/सा.क्र.९ | जनरल रजिस्टर नोंदवही |
| १८ | निशाणी ९१/सा.क्र.१० | पिडीतेचे कपडे जप्ती पंचनामा |
| १९ | निशाणी १०० ते १०२/सा.क्र.१२ | पिडीतेचा मूळ प्रवेश अर्ज, निर्गम उतारा, जनरल रजिस्टर नोंद |
| २० | निशाणी पी३/सा.क्र.१४ | पिडीतेच्या जन्म अहवाल |
| २१ | निशाणी पी५/सा.क्र.१५ | आरोपी अटक पंचनामा |
| २२ | निशाणी ३१ ते ३४ | पृथःकरण अहवाल |

आरोपीतर्फे मान्य केलेली कागदपत्र निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

Digitally signed by SHANKAR GANPATRAO THUBE
Date: 2026.07.16 18:09:22 +0530

दिनांक – १६.०७.२०२६ (एस. जी. ठुबे)

न्यायाधीश, जलदगती विशेष न्यायालय,

धाराशिव.

| MHOS010003042021 | | | | |
|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | - | ०४-०२-२०२१ | |
| | नोंदणी दिनांक | - | ०४-०२-२०२१ | |
| | निकाल दिनांक | - | १६-०७-२०२६ | |
| | कालावधी | वर्षे | महिने | दिवस |
| | एकूण - | ०५ | ०५ | १२ |

धाराशिव येथील जलदगती विशेष न्यायालय यांचे न्यायालयात

**(पिठासीन अधिकारी एस. जी. ठुबे)**

**विशेष खटला क्रमांक १०/२०२१**

**निशाणी –**

महाराष्ट्र शासन,
मार्फत धाराशिव पोलीस स्टेशन
धाराशिव, जि.धाराशिव. ... फिर्यादी

विरुध्द

संजय रविंद्र चव्हाण,
वय २३ वर्षे, धंदा – आचारी,
रा. उक्षी, ता. जि.रत्नागिरी ... आरोपी

---

फिर्यादीपक्षाकरीता - सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन.वाय.साबळे
आरोपीकरीता - विधीज्ञ वाय. डी. खैरे

---

न्यायनिर्णय

(घोषित केल्याचा दिनांक १६ जुलै २०२६)

१. आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३६३, ३६६ (अ), ३७६ (२), ३७६ (३) आणि लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ कलम ४, ६ अन्वये गुन्हा केला आहे असा आरोप आहे. या प्रकरणाची

हकीगत थोडक्यात खालील प्रमाणे आहे.

२. फिर्यादी हिने ०९.१२.२०२० रोजी फिर्याद दाखल केली. तिचे असे म्हणणे आहे की, ०७.१२.२०२० रोजी या गुन्हयातील पिडीता जिचे वय १५ वर्षे ६ महिने ही सायंकाळी ६.३० वाजणेच्या सुमारास मैत्रीणीकडे जाते असे म्हणून घरातून गेली. ती संध्याकाळपर्यंत वाट पाहिली असता आली नाही. तसेच भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता तिचा भ्रमणध्वनी बंद येत होता. त्याचप्रमाणे तिच्या मैत्रीणींकडे व नातेवाईकांकडे पिडीतेबाबत चौकशी केली असता तिचा ठावठिकाणा लागला नाही. म्हणून फिर्यादी हिने तिची मुलगी (पिडीता) हिचे कोणी तरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी फूस लावून अपहरण केले अशा आशयाची फिर्याद दाखल केलेली आहे.

३. फिर्यादीने फिर्याद दाखल केल्यानंतर गु.र.नं.३८८/२०२० असा शहर पोलीस ठाणे उस्मानाबाद येथे नोंदवण्यात आला. त्यानंतर सदर गुन्हयाचा तपास पोलीस अधिकारी श्री. शंकर मधुकर सुर्वे यांचेकडे देण्यात आला. या साक्षीदाराने तपासाच्या दरम्यान फिर्यादीकडे चौकशी केली असता, आरोपी हा तुळजाई उपहारगृहामध्ये काम करत असून तो फिर्यादीच्या घराजवळ रहात होता, असे निष्पन्न झाले. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी आरोपी ज्या उपहारगृहामध्ये काम करत होता, तेथे त्याची चौकशी केली असता तो गैरहजर असल्याचे दिसून आले. तपासा दरम्यान तपासी अधिकारी यांनी आरोपीचा भ्रमणध्वनी नंबर प्राप्त करुन घेतला आणि त्याचे भ्रमणध्वनीचे लोकेशन हे सायबर सेल मार्फत चौकशी करुन घेतले. त्या लोकेशननुसार आरोपी हा रत्नागिरी जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात असल्याचे दिसून आले. त्यानंतर या साक्षीदाराने त्यांचे कर्मचारी गोरे, कुंभार आणि फिर्यादी यांना रत्नागिरीला पाठवले. त्याठिकाणी आरोपी व पिडीता मिळून आली. सदरच्या गोरे, कुंभार यांनी पिडीता व आरोपीला पोलीस ठाण्यात आणले.

त्याबद्दलचे कागदपत्र ही कुंभार या कर्मचा–याने देवरुच पोलीस ठाण्यात दिली. त्यानंतर पिडीतेचा जबाब नोंदवण्यासाठी महिला पोलीस कर्मचारी बक्कल नंबर ९५७ यांना आदेशित केले. नंतर पिडीतेला फिर्यादी समवेत सरकारी दवाखाना धाराशिव येथे वैद्यकीय तपासणीसाठी स्वतंत्र पत्र देवून पाठवले. आरोपी यास सविस्तर पंचनामा करुन अटक केले. आरोपी हा मौजे उक्षी, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी येथे सन २०१७–२०१८ पर्यंत रहात होता असे त्याने सांगितले व त्यानंतर तो धाराशिव येथे कुरणे नगर येथे राहण्यास आल्याचे सांगितले. आरोपी याने ज्या ज्या ठिकाणी तो पिडीतेला घेऊन गेला, ते दाखवण्यास तयार आहे असे सांगितल्याने त्या ठिकाणचे पंचनामे पंचाच्या उपस्थितीत या साक्षीदाराने केले. आरोपी यास वैद्यकीय तपासणीसाठी स्वतंत्र पत्र देवून पाठवले.

४. त्यानंतर या गुन्हयात जप्त केलेले पिडीता व आरोपी यांचे कपडे तसेच त्यांचे आवश्यक ते घेतलेले नमुने हे संबंधित पृथःकरण प्रयोगशाळा येथे संबंधित कर्मचा–यामार्फत पाठवले. तसेच पिडीतेच्या जन्मतारीख निश्चितीबाबत नगर परिषद, उस्मानाबाद यांना पत्रव्यवहार केला. तसेच ती ज्या शाळेत इयत्ता पहिलीच्या वर्गात शिकत होती, त्या शाळेलाही पत्रव्यवहार केला. पिडीता व इतर महत्वाच्या साक्षीदारांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ चा जबाब देण्यासाठी संबंधित प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात जाण्याबाबत सूचना करुन तसे संबंधित प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांना पत्रही दिले. तसेच या गुन्हयाच्या संबंधाने महत्वाच्या साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले. येणे प्रमाणे उपरोक्त उल्लेखलेल्या तपासांती तपासी अधिकारी यांच्या असे निदर्शनास आले की, आरोपी विरुध्द सकृतदर्शनी पुरावा मिळून आलेला आहे. म्हणून त्यांनी संबंधित न्यायालयात आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

५. माझ्या पूर्वाधिका–याने निशाणी ६ नुसार दोषारोप निश्चित केले आहे. आरोपीने निशाणी ७ नुसार असणा–या जबाबप्रमाणे गुन्हा नाकबुल केला आहे.

६. फिर्यादी पक्षाने फिर्याद / आरोप शाबीत करण्याकरीता एकूण पंधरा साक्षीदारांचा तोंडी पुरावा नोंदवला आहे. आरोपीचा असा बचाव आहे की, त्याने हा गुन्हा केलेला नाही.

७. फिर्यादी पक्षाकरीता सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन. वाय. साबळे व आरोपींकरीता विधीज्ञ श्री. वाय. डी. खैरे यांचा युक्तीवाद ऐकला.

८. फिर्यादी पक्षाचा पुरावा, आरोपीचा बचाव आणि उभय बाजूंचा युक्तीवाद विचारात घेता प्रस्तुतचे प्रकरण निकाली काढण्याकरीता खालील वादप्रश्न उपस्थित होतात. या वादप्रश्नांना माझी उत्तरे आणि त्याची कारणे मी खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अ. क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक०७.१२.२०२० रोजी सुमारे ६.३० वाजणेच्या सुमारास बार्शी रोड उस्मानाबाद येथील फिर्यादीच्या घरुन पिडीता जिचे वय १५ वर्षे ६ महिने आहे, तिला तिच्या पालकांच्या संमतीशिवाय आणि त्यांच्या कायदेशीर संरक्षणातून, लग्नाचे आमिष दाखवून अपहरण केले आणि तिला पुणे व रत्नागिरी जिल्ह्यातील उक्षी गावात नेले म्हणून भारतीय दंड विधान कलम ३६३ अन्वये गुन्हा केलेला आहे, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली का ? | नाही |
| २. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने पिडीत मुलीचे अपहरण या उद्देशाने केले की, त्या अल्पवयीन मुलीला अनैतिक लैंगिक संबंधांसाठी तिला फूस लावून | नाही |

| | | |
|---|---|---|
| | पळवून नेले व भारतीय दंड विधान कलम ३६६ (अ) अन्वये गुन्हा केलेला आहे, ही बाब फिर्यादी पक्षाने शाबीत केली का ? | |
| ३. | सप्टेंबर २०२० मध्ये मौजे वडगांव येथे एकदा, तुळजाई हॉटेलच्या पाठीमागे बार्शी रोड, उस्मानाबाद येथे आणि दिनांक ०९.१२.२०२० रोजी रात्री मौजे उक्षी, रत्नागिरी येथे आरोपीने अल्पवयीन पीडितेवर वारंवार जबरी बलात्कार केला म्हणून भारतीय दंड विधान कलम ३७६ अन्वये गुन्हा केलेला आहे, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली का? | नाही |
| ४. | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने आरोपीने १५ वर्षे ६ महिने वय असलेल्या (म्हणजेच १६ वर्षांखालील) पीडितेवर जबरी बलात्कार केला म्हणून भारतीय दंड विधान कलम ३७६ (३) अन्वये गुन्हा केलेला आहे, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली का? | नाही |
| ५. | वर नमूद केलेल्या तारखेला, वेळी आणि ठिकाणी, आरोपीने पिडीतेवर भेदनकारक लैंगिक अत्याचार केला म्हणून बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम कलम ४ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली का ? | नाही |
| ६. | वर नमूद केलेल्या तारखेला, वेळी आणि ठिकाणी, आरोपीने अल्पवयीन पिडीत मुलीवर गंभीर स्वरूपाचे लैंगिक शोषण (शरीरसंबंधांचा समावेश असलेले) केले | नाही |

| | | |
|---|---|---|
| | म्हणून बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम कलम ६ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली का ? | |
| ७. | अंतिम आदेश काय? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्रमांक १ ते ६ करीता –**

९. पुराव्याची द्वीरुक्ती टाळण्याकरीता मी या सर्व वादप्रश्नांची उत्तरे एकाच ठिकाणी देतो.

१०. अभियोग पक्षाने आरोपीवर ठेवलेले दोषारोप सिध्द करण्याच्या दृष्टीने एकूण पंधरा साक्षीदारांची साक्ष न्यायालयासमोर नोंदवलेली आहे. ते म्हणजे पिडीता, तिची आई (फिर्यादी), मामी, पिडीतेची जन्मतारीख सिध्द करण्याच्या उद्देशाने ती ज्या वेगवेगळया शाळेत शिकली, त्या शाळेचे मुख्याध्यापक, नगर परिषद कर्मचारी, सर्व घटनास्थळाच्या पंचनाम्यातील पंच, तसेच पिडीता व आरोपी यांचे कपडे जप्ती पंचनाम्यातील पंच, पिडीता व आरोपी यांची वैद्यकीय तपासणी केलेले वैद्यकीय अधिकारी, पिडीतेचे वय निश्चितीसाठीचे वैद्यकीय अधिकारी, मुद्देमाल पृथःकरण प्रयोगशाळेत घेऊन जाणारा कर्मचारी, या गुन्हयाचे तपासी अधिकारी व इतर अशा साक्षीदारांची साक्ष नोंदवलेली आहे.

११. सा.क्र.१ म्हणून ज्या साक्षीदाराची साक्ष निशाणी ३५ नुसार नोंदवली आहे, ते मौजे उक्षी, ता.रत्नागिरी येथील घटनास्थळाच्या पंचनाम्यातील पंच आहेत. हा साक्षीदार त्याचे सरतपासणीत तो पंचायत समिती रत्नागिरी येथे कार्यरत असल्याचे आणि १७.१२.२०२० रोजी त्याच्या वरिष्ठांच्या आदेशाने सदरच्या घटनास्थळाच्या पंचनाम्यास गेल्याचे सांगत आहे. या साक्षीदाराच्या म्हणण्याप्रमाणे

सदरचे घटनास्थळ हे उक्षी गावचे धबधब्याचे बाजूला नदीशेजारी होते. घटनास्थळावरुन एक ओढणी जप्त करण्यात आली. सदरचा घटनास्थळ पंचनामा निशाणी ३७ नुसार असून ती ओढणी आर्टीकल अ नुसार आहे.

१२. मात्र या साक्षीदाराच्या उलट तपासाचे अवलोकन केले असता असे कबूल करतो की, यापूर्वीही या साक्षीदाराने पंचनाम्यावर पंच म्हणून सहया केलेल्या आहेत. ज्या घराचा पंचनामा केला, ते घर कोणाच्या मालकीचे होते, ते या साक्षीदारास माहिती नाही. या साक्षीदारास आरोपी याचे पूर्णनांव आठवत नाही. या साक्षीदाराच्या या कबुली कथनांवरुन हा साक्षीदार निशाणी ३७ नुसार असणा–या पंचनाम्यातील घटनास्थळी पंचनाम्यासाठी गेला होता किंवा काय, याबाबत संशय निष्पन्न होतो.

१३. त्यानंतर सा.क्र.२ म्हणून ज्या साक्षीदाराची साक्ष ३८ निशाणी नुसार नोंदवली असून ती पिडीता असून ती तिचे सरतपासणीमध्ये तिची जन्मतारीख ०६.०५.२००५ अशी असल्याचे सांगत आहे. ती आरोपीस ओळखते. तिच्यात आणि आरोपी मध्ये हा गुन्हा दाखल होण्यापूर्वी पासून एक वर्षे अगोदरपासून प्रेमसंबंध होते. तिचेत व आरोपी मध्ये सप्टेंबर २०२० मध्ये मौजे वडगांव येथील सिध्देश्वर मंदिराजवळ शारिरीक संबंध आले होते. तसेच पिडीतेच्या घराजवळ असणा–या तुळजाई उपहारगृहाच्या पत्र्याच्या खोलीतही त्यांचेत शारिरीक संबंध आले होते. मात्र काही दिवसानंतर त्यांच्यातील प्रेमसंबंधाबाबत तिच्या घरी समजल्याने तिच्या कुटूंबियांनी त्यास तिव्र विरोध केला आणि तिला ०४.११.२०२० रोजी माडज येथे मामाचे घरी राहण्यास पाठवले. त्यावेळी तिच्या आईवडिलांच्या कुटूंबात तिच्या विवाहाबद्दल बोलणी चालू झाली होती, मात्र ते तिला मान्य नव्हते. म्हणून तिने आरोपी यास सदर बाब सांगून तिला घेऊन

जाण्यासाठी तिच्या मामाच्या घरी बोलावले. तेंव्हा आरोपी हा ०७.१२.२०२० रोजी तिच्या मामाच्या घरी गेला, त्यावेळी तिने तिच्या आजोबांच्या डब्यातील रुपये २५००/– घेऊन ती आरोपी सोबत स्वखुशीने गेली. प्रथम ते बसने पुण्याला गेले व तेथून रात्री ते रत्नागिरीला गेले. तेथे ते आरोपीच्या आईच्या घरी राहिले. त्याठिकाणीही त्यांचे शारिरीक संबंध आले. त्यानंतर १० तारखेला (१०.१२.२०२०) तिची आई व पोलीस असे सदर रत्नागिरीच्या ठिकाणी आल्याने तिला व आरोपीला पोलीस ठाण्यात आणले व तिचा जबाब नोंदवला. तो जबाब निशाणी ३९ नुसार आहे. तसेच तिने तिचे जप्त केलेले कपडे ओळखले. त्यामध्ये टॉप, जीन्स, गुलाबी रंगाची ब्रा, पांढ–या रंगाची स्लीप, विटकरी रंगाची निकर या कपडयांचा समावेश होता. तसेच आरोपींच्या कपडयांमध्ये शर्ट, पॅन्ट व अंडरविअर यांचा समावेश होता. सदरचे सर्व कपडे पिडीतेने ओळखले. ते आर्टीकल 'सी' ते 'जे' ("C" to "J") नुसार आहेत.

१४. मात्र या साक्षीदाराने तिचे उलट तपासात असे कबूल केले की, तिला इयत्ता पहिलीच्या वर्गात तिचे वयाचे सहा वर्षे पूर्ण झाल्यानंतर घातलेले होते. तिच्यात आणि आरोपी यांच्यात जे काय प्रेमसंबंध होते, ते दोघांच्या संम्मतीने होते. तिला वडगांव सिध्देश्वर मंदिराकडे ते नेमके केव्हा गेले होते, ती तारीख सांगता येत नाही. तसेच आरोपी सोबत सदर ठिकाणी नेमके कोणत्या तारखेला शारिरीक संबंध झाले, ती तारीख ही सांगता येत नाही. त्याचप्रमाणे हॉटेल तुळजाईच्या पत्र्याच्या खोलीत नेमके कोणत्या तारखेला शारिरीक संबंध झाले, ती तारीख ही तिला सांगता येत नाही. तसेच मौजे उक्षी, ता.संगमेश्वर जि. रत्नागिरी येथे जे काय शारिरीक संबंध झाले, त्याची ही तारीख तिला सांगता येत नाही. तिने वडगांव सिध्देश्वर मंदीर या ठिकाणी झालेल्या शारिरीक संबंधाबाबत तसेच हॉटेल तुळजाईच्या पत्र्याच्या खोलीत झालेल्या शारिरीक संबंधाबाबत आरोपीविरुध्द

फिर्याद दाखल केली नव्हती. तिच्या आईवडिलांना त्यांचे प्रेमसंबंधाबाबत ऑक्टोबर २०२० मध्ये समजले. ज्यावेळी तिचे आईवडील तिला आरोपीसोबतचे प्रेमसंबंध सोड असे म्हणायचे त्यावेळी ती त्यास नकार देवून विवाह करेल तर आरोपीशी करेल असे त्यांना म्हणायची. तसेच आरोपीनेही तिचे वयाचे १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर तिच्याबरोबर विवाह करेल असे तिचे आईवडिलांना सांगितले होते. ऑक्टोबर २०२० नंतरही ती व आरोपी एकमेकांबरोबर भ्रमणध्वनीवरुन संभाषण करायचे. तिचा तिच्या विवाहासाठी दुसरे स्थळ शोधण्यासाठी तिव्र विरोध होता. तिने पोलिसांना जबाब देईपर्यंत तिचेत व आरोपीमध्ये शारिरीक संबंध आले याबाबत तक्रार केलेली नव्हती, तसेच इतर कोणालाही सांगितले नव्हते. तिला आरोपीची आई ज्याठिकाणी उक्षी येथे भेटली, त्या ठिकाणचे नाव सांगता येत नाही. तिने तिला व आरोपीला शहर पोलीस ठाणे उस्मानाबाद येथे आणेपर्यंत तिचेत व आरोपीमध्ये शारिरीक संबंध आले होते असेही सांगितलेले नाही. तिने तिच्या फौ.प्र.सं.१६४ च्या निशाणी ४० नुसार असणा–या जबाबात आरोपीने तिच्यावर जबरदस्ती केली असे सांगितले नव्हते. तसेच तिला त्या जबाबात नेमके काय लिहिलेले आहे, याबाबत काही एक आठवत नाही. तिने या न्यायालयात साक्षीला आली त्यावेळी निशाणी ३९ नुसार जो काही जबाब दिलेला आहे, तो प्रथम साक्ष सुरु होण्यापूर्वी वाचून पाहिला आणि त्यावेळेसच तिला निशाणी ३९ च्या जबाबाबाबतची माहिती झाली. पोलीस ठाण्यात तिला व आरोपीला आणल्यानंतर तिचे आईवडील आरोपीबरोबर विवाह कर असे म्हणत होते, याबद्दल काही एक माहिती नाही. तसेच तिच्या आईवडिलांनी आरोपीबरोबर विवाह करण्यास होकार दिला होता किंवा काय, याबाबत काही एक आठवत नाही.

१५. येणे प्रमाणे उपरोक्त उल्लेखलेल्या या साक्षीदाराच्या कबुली

कथनावरुन तिला आरोपी याने फूस लावून जबरदस्तीने शारिरीक संबंध प्रस्थापित करण्याच्या हेतूने तिचे अपहरण केले होते असे सिध्द होत नाही. उलट ती तिच्या स्वमर्जीने तिच्यात व आरोपीमध्ये असलेल्या प्रेमसंबंधामुळे आरोपीबरोबर गेल्याचे दिसून येते. तसेच ती तिचेत आणि आरोपीमध्ये वेळोवेळी जे काय शारिरीक संबंध आले असे तिचे मत आहे, त्याबाबत निश्चित अशा तारखा सांगत नाही. तसेच असेही दिसून येते की, प्रथम सप्टेंबर २०२० मध्ये तिच्या म्हणण्याप्रमाणे तिच्यात व आरोपीमध्ये जे काय शारिरीक संबंध आले, त्यावेळी जरी ती अज्ञान असली तरी तिला बेकायदेशीर शारिरीक संबंधाचे काय परिणाम असतात याची जाणीव असल्याचे आणि खरे काय, वाईट काय, याबाबतची चांगल्या प्रकारची आकलनशक्ती असल्याचे दिसून येते. म्हणून तिच्या उलट तपासातील कबुली कथनांवरुन आरोपीने तिचेसोबत जबरदस्तीने शारिरीक संबंध केले असा निष्कर्ष काढणे न्याय व योग्य ठरणार नाही आणि त्या संबंधासाठीच तिचे अपहरण केले असाही निष्कर्ष काढणे न्याय व योग्य होणार नाही. तसेच या प्रकरणात प्रथम शारिरीक संबंध झाल्यानंतर व त्यानंतर शारिरीक संबंध झाल्यानंतर पिडीतेने किंवा तिचे आईवडील यांनी कोणीही लगेच फिर्याद दाखल केली नाही. तसेच तिची वैद्यकीय तपासणी शारिरीक संबंधानंतर बरेच दिवसानंतर झालेली आहे. त्यामुळे घेतलेले नमुन्याचे अहवाल हे शारिरीक संबंध झाल्याचे दाखवत नाही. म्हणून पिडीता हिची साक्ष आरोपीवर ठेवलेले दोषारोप विनासंशयविरहित सिध्द करण्यासाठी उपयुक्त नाही असे माझे मत आहे.

१६. त्यानंतर सा.क्र.३ म्हणून ज्या साक्षीदाराची साक्ष निशाणी ४६ नुसार नोंदवली आहे, तो वडगांव सिध्देश्वर आणि तुळजाई हॉटेलच्या पाठीमागील घटनास्थळाचा तसेच आरोपीच्या कपडे जप्ती पंचनाम्यातील पंच साक्षीदार आहे. हा साक्षीदार त्याचे सरतपासणीमध्ये सदर पंचनाम्यांना सहाय्यभूत ठरेल अशी साक्ष देत

आहे. म्हणजेच सदरचे पंचनामे या साक्षीदाराच्या उपस्थितीत घटनास्थळावर झाल्याचे आणि आरोपी याचे कपडे पोलीस ठाण्यात जप्त केल्याचे सांगत आहे. तसेच त्या पंचनाम्यावर त्याची सही असल्याचे आणि त्या पंचनाम्यातील मजकूर हा बरोबर असल्याचे सांगत आहे. सदरचे पंचनामे हे निशाणी ४७ व निशाणी ४८ नुसार आहेत.

१७. मात्र या साक्षीदाराच्या उलट तपासाचे अवलोकन केले असता हा साक्षीदार असे कबूल करतो की, यापूर्वी या साक्षीदाराने अंदाजे चार प्रकरणांमध्ये पंचनाम्यावर सहया केलेल्या असतील. या साक्षीदारास वडगांव सिध्देश्वर मंदिराजवळील चिंचेचे झाड असलेली शेतजमिनीचा गट नंबर काय होता, हे सांगता येत नाही. तसेच तुळजाई उपहारगृहाच्या मागे जे पत्र्याचे शेड होते, ते कोणाचे होते, हे ही सांगता येत नाही. त्याचप्रमाणे या साक्षीदाराने आणि दुस–या पंचाने वडगांव सिध्देश्वर मंदीर या ठिकाणचा आणि बार्शी रोडच्या पत्र्याच्या शेडच्या पंचनाम्यावर पोलीस ठाण्यात आल्यानंतर सहया केलेल्या आहेत असे सांगत आहे.

१८. अशा प्रकारे या साक्षीदाराच्या उपरोक्त उल्लेखलेल्या कबुली कथनांवरुन हा साक्षीदार संबंधित पोलीस ठाण्याचा कायमचा पंच साक्षीदार असल्याचे दिसून येते. तसेच हा साक्षीदार वडगांव सिध्देश्वर येथील घटनास्थळाच्या पंचनाम्यास तसेच तुळजाई उपहारगृहाच्या पाठीमागे असणा–या पत्र्याच्या शेडच्या पंचनाम्यास हजर होता किंवा काय, याबाबत विश्वासग्राहयता दिसून येत नाही. हा साक्षीदार जरी आरोपीच्या कपडे जप्तीचा पंचनाम्यातील पंच असला आणि तो पंचनामा सिध्द झालेला असला तरी तो पंचनामा अभियोग पक्षास आरोपीवर ठेवलेले दोषारोप सिध्द करण्यास उपयुक्त नाही, कारण आरोपी हा त्याचे कपडे जप्त केल्याचे कोठेही नाकारत नाही. मात्र जप्त केलेले कपडे हे आरोपी याने पिडीतेबरोबर

शारिरीक संबंध प्रस्थापित करताना परिधान केलेले होते हे अभियोग पक्षाने सिध्द केलेले नाही. म्हणून कपडे जप्तीचा पंचनामा सुध्दा जरी सिध्द झालेला असला तरी तो अभियोग पक्षास उपयुक्त नाही असे माझे मत आहे.

१९. त्यानंतर सा.क्र.४ म्हणून ज्या साक्षीदाराची साक्ष निशाणी ५० नुसार नोंदवली आहे, ती पिडीतेची आई आहे. ही साक्षीदार तिचे सरतपासणीमध्ये पिडीतेची जन्मतारीख ०६.०५.२००५ असल्याचे सांगत आहे. तसेच उल्लेखित घटनेच्या वेळी पिडीता ही मौजे माडज येथे तिच्या मामाकडे रहात होती, असेही सांगत आहे. उल्लेखित घटनेच्या दिवशी म्हणजेच ०७.१२.२०२० रोजी पिडीता घरी आली नाही, म्हणून या साक्षीदाराच्या भावजयीने या साक्षीदारास पिडीतेच्या ठावठिकाण्याबाबत विचारणा केली. त्यानंतर पिडीतेचा तिच्या मैत्रीणीकडे, नातेवाईकांकडे व इतर ठिकाणी शोध घेतला असता ती मिळून न आल्यामुळे या साक्षीदाराने निशाणी ५१ नुसार असणारी फिर्याद दाखल केलेली आहे. पुढे ही साक्षीदार तिचे सरतपासणीत असे सांगते की, तिला पोलीस ठाण्यातून फोन आल्यामुळे ती पोलिसांसमवेत रत्नागिरी येथे पिडीतेचा शोध घेण्यासाठी गेली होती. त्यावेळेस आरोपीच्या आईच्या धाब्यावर ते गेले होते व त्याठिकाणाहून तिला आरोपीच्या घरी नेण्यात आले. तेथे पिडीता व आरोपी मिळून आले. या साक्षीदारास पिडीतेवर झालेल्या शारिरीक अत्याचारा संदर्भात जी काय माहिती समजून आली, ती पिडीतेकडून समजली आहे.

२०. मात्र या साक्षीदाराच्या उलट तपासाचे अवलोकन केले असता ती असे कबूल करते की, ०७.१२.२०२० रोजी पिडीता ही कोणाबरोबर पळून गेली, हे तिला माहित नव्हते. या साक्षीदारास पिडीता व आरोपीचे प्रेमसंबंध होते, हे अगोदर पासून माहित होते. पिडीतेने तिला ०७.१२.२०२० पर्यंत, तिचेत आणि आरोपीमध्ये मौजे वडगांव, तुळजाई हॉटेलच्या मागे या ठिकाणी शारिरीक संबंध

आल्याचे सांगितले नव्हते. ही साक्षीदार रत्नागिरीच्या ज्या धाब्यावर गेली होती, त्या धाब्याचे नाव तिला माहित नाही. तसेच आरोपी व पिडीता जेथे मिळून आले, त्या ठिकाणचे नाव माहित नाही. तसेच तिच्या जबाबात ती मौजे उक्षी या गावी गेली होती, असाही उल्लेख नाही. पिडीतेने रत्नागिरीवरुन उस्मानाबाद शहर पोलीस ठाण्यात येईपर्यंत तिचे आरोपीबरोबर शारिरीक संबंध झाले होते अशी माहिती सांगितली नव्हती. तिने तिच्या निशाणी ५२ च्या फौ.प्र.सं. कलम १६४ च्या जबाबात आरोपी व पिडीतेमधील प्रेमसंबंध असल्याचे कबूल केलेले आहे.

२१. अशा प्रकारे या साक्षीदाराच्या उपरोक्त उल्लेखलेल्या कबुली कथनांवरुन, दिनांक ०७.१२.२०२० रोजी आरोपीने पिडीतेस फूस लावून शारिरीक संबंध प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने पळवून नेले होते, असे अभियोग पक्षाने विना संशयविरहित सिध्द केलेले नाही. उलट या साक्षीदाराच्या उपरोक्त उल्लेखलेल्या कबुली कथनांवरुन पिडीता व आरोपी यांच्यामध्ये पूर्वीपासून प्रेमसंबंध असल्याचे आणि त्या दोघांमध्ये त्या प्रेमसंबंधातून वारंवार शारिरीक संबंध प्रस्थापित झाल्याचे दिसून येते. तसेच उल्लेखित घटनेच्या वेळी व तत्पूर्वी सुध्दा पिडीता ही समज आल्याच्या वयात होती. म्हणजेच तिला फायद्याचे, तोटयाचे याची आकलनशक्ती, तसेच बेकायदेशीर शारिरीक संबंधाचे दुष्परिणाम काय असू शकतात याचे चांगल्या प्रकारे आकलन असल्याचे दिसून येते. म्हणून मी या सा.क्र.४ हिची साक्ष अभियोग पक्षास आरोपीवर ठेवलेले दोषारोप सिध्द करण्यास उपयुक्त नाही असाच निष्कर्ष नोंदवत आहे.

२२. त्यानंतर सा.क्र.५ म्हणून ज्या साक्षीदाराची साक्ष निशाणी ५५ नुसार नोंदवली आहे, ते आरोपी याचे वैद्यकीय तपासणी करणारे वैद्यकीय अधिकारी आहेत. या साक्षीदाराने आरोपीची वैद्यकीय तपासणी संबंधित पोलीस ठाण्याने

पाठवलेल्या निशाणी ५६ च्या पत्राच्या अनुषंगाने केलेली आहे. तसेच या वैद्यकीय तपासणीसाठी आरोपीची संम्मती घेऊन त्यांची संम्मती अर्जावर सही घेतलेली आहे. आरोपीची वैद्यकीय तपासणी करताना त्याने पिडीतेबरोबर शारिरीक संबंध झाल्याची पार्श्वभूमी आरोपीने सांगितलेली नाही. आरोपी हा शारिरीक संबंध प्रस्थापित करण्यास सक्षम होता. या साक्षीदाराने आरोपीची वैद्यकीय तपासणी करुन आवश्यक ते नमुने घेतले आणि वैद्यकीय तपासणीचा अहवाल जो काय दाखल केला आहे, तो निशाणी ५७ नुसार आहे. आरोपी हा शारिरीक संबंध करण्यास सक्षम नाही असा बचाव आरोपीने कोठेही घेतलेला नाही. म्हणून या साक्षीदाराची साक्ष आरोपीवर ठेवलेले दोषारोप सिध्द करण्यास अभियोग पक्षास उपयुक्त नाही असे माझे मत आहे. कारण या आरोपीची वैद्यकीय तपासणी करण्यापूर्वी त्याने जी काय पार्श्वभूमी सांगितलेली आहे, त्यात त्याचेत व पिडीतेमध्ये शारिरीक संबंध आलेले आहेत, असे सांगितलेले नाही.

२३. त्यानंतर सा.क्र.६ म्हणून ज्या साक्षीदाराची साक्ष निशाणी ५८ नुसार नोंदवलेली आहे, ते पिडीता हिची वैद्यकीय तपासणी करणारे वैद्यकीय अधिकारी आहेत. हा साक्षीदार असे सांगतो की, दिनांक ११.१२.२०२० च्या संबंधित पोलीस ठाण्याने पाठवलेल्या निशाणी ६१ च्या पत्रानुसार या साक्षीदाराने पिडीतेची वैद्यकीय तपासणी केलेली आहे. सदरच्या पत्रानुसार पिडीतेवर अतिप्रसंग झाला किंवा काय, तिचे आवश्यक ते नमुने घेण्या संदर्भात कळवण्यात आले होते. पिडीतेची तिची जन्मतारीख ही ०६.०५.२००५ अशी पिडीतेने सांगितली. तिची वैद्यकीय तपासणी करण्यापूर्वी तिची पूर्व परवानगी घेऊन, पूर्व परवानगीच्या अर्जावर तिची सही घेतली होती. पिडीतेने घटनेची पार्श्वभूमी सांगताना असे सांगितले की, ०७.१२.२०२० रोजी सायंकाळी ६.३० वाजता ती आरोपी याच्यासोबत पुणे येथे पळून गेली होती व त्यानंतर ते रत्नागिरी येथे आले. दिनांक ०९.१२.२०२० रोजी

तिचेत आणि आरोपी मध्ये शारिरीक संबंध आले होते. पिडीतेने तिच्याबरोबर झालेल्या शारिरीक संबंधाच्या वेळी परिधान केलेले कपडे बदललेले होते. तसेच तिने वारंवार स्नानही व लघवी केलेली होती. पिडीता ही शेवटच्या शारिरीक संबंधाच्या घटनेनंतर दोन – तीन दिवसानंतर वैद्यकीय तपासणीसाठी आली होती. या साक्षीदाराने पिडीतेचे आवश्यक ते नमुने घेतले आणि वैद्यकीय तपासणीचा अहवाल निशाणी ६२ नुसार दिला. या प्रकरणात आलेले पृथःकरण अहवाल, पिडीतेचे नमुने हे शारिरीक संबंध आल्यानंतर काही दिवसानंतर घेतल्याने आणि त्यानंतर पिडीतेने स्नान केलेले असल्याने नकारात्मक येऊ शकतात असे या साक्षीदाराचे मत आहे. परंतू पिडीतेबरोबर शारिरीक संबंध झालेले असावेत अशी शक्यता नाकारता येत नाही असे या साक्षीदाराचे म्हणणे आहे. पिडीतेच्या वया संदर्भातील अहवाल हा निशाणी ६३ नुसार आहे. तसेच आयपीडी पेपर्स, जे डेंन्टीस्ट आणि रेडिओलॉजिस्ट यांनी दिलेले आहेत, ते निशाणी ६४ नुसार आहेत. निशाणी ६३ च्या वयाच्या अहवालानुसार उल्लेखित घटनेच्या वेळी पिडीता ही १४ ते १७ या वयोगटातील होती.

२४. या साक्षीदाराच्या उलट तपासाचे अवलोकन केले असता ही साक्षीदार असे कबूल करते की, निशाणी ६१ नुसार असणा–या पत्रात संबंधित पोलीस ठाण्याने या गुन्हयाची पार्श्वभूमी नमूद केलेली होती. निशाणी ६२ नुसार असणा–या या साक्षीदाराच्या अहवालामध्ये तारखेबाबत खाडाखोड आहे. तसेच निशाणी ६२ च्या कॉलम १५–एफ मध्ये जे काय नमूद केलेले आहे ते या साक्षीदाराचे निरीक्षण नाही. दिनांक ११.१२.२०२० पर्यंत या साक्षीदारास डेन्टीस्ट आणि रेडिओलॉजिस्ट यांचा अहवाल प्राप्त झालेला नव्हता. निशाणी ६३ नुसार पिडीतेचे जे काय वय दाखवले आहे, त्यास २ – ३ असे पुढे मागे असे error of

margin चे तत्वे लागू आहे. ही साक्षीदार पिडीतेचे निश्चित असे वय सांगू शकत नाही.

२५. अशा प्रकारे या साक्षीदाराच्या उपरोक्त उल्लेखलेल्या कबुली कथनांवरुन पिडीता ही शारिरीक संबंध ठेवण्यास सक्षम असल्याचे निष्पन्न होते. परंतू पिडीतेबरोबर आरोपीने तथाकथित कालावधीमध्ये जबरदस्तीने शारिरीक संबंध प्रस्थापित केले हे अभियोग पक्षाने सिध्द केलेले नाही. कारण ही साक्षीदार असे कबूल करते की, सदरचे तथाकथित शारिरीक संबंध झाल्यानंतर पिडीतेने परिधान केलेले कपडे तर बदललेले आहेत, शिवाय तिने स्नानही केलेले आहे. तसेच वारंवार लघवीही केलेली आहे. त्याचप्रमाणे या साक्षीदाराच्या साक्षीमधून पिडीतेचे वय हे १४ ते १७ असे जरी सांगितले असले तरी error of margin च्या तत्वानुसार ते वय १७ ते २० असे सुध्दा असू शकते. कारण ही साक्षीदार पिडीतेचे निश्चित किती वय होते, याबाबत काही एक सांगत नाही. म्हणून या साक्षीदाराची साक्ष अभियोग पक्षास पिडीता ही उल्लेखित घटनेच्या वेळी अज्ञान होती आणि तिचे सोबत आरोपीने जबरदस्तीने शारिरीक संबंध प्रस्थापित केले, ही बाब सिध्द करण्यास उपयुक्त नाही असे माझे मत आहे.

२६. त्यानंतर अभियोग पक्षाने पिडीतेचे वय सिध्द करण्याच्या दृष्टीने सा.क्र.७ मुख्याध्यापक निशाणी ६८, सा.क्र.८ वैद्यकीय अधिकारी निशाणी ७७, सा.क्र.९ मुख्याध्यापक निशाणी ८३, सा.क्र.१२ मुख्याध्यापक निशाणी ९९ आणि सा.क्र.१४ नगर परिषद कर्मचारी निशाणी १२२ या पाच साक्षीदारांची साक्ष नोंदवलेली आहे. या पाचही साक्षीदारांच्या सरतपासणीचे अवलोकन केले असता सा.क्र.७, सा.क्र.९, सा.क्र.१२ हे असे सांगतात की, पिडीतेने त्यांच्या संबंधित शाळेत / विद्यालयात प्रवेश घेताना तिच्या पालकांनी जी काय जन्मतारीख सांगितलेली आहे, ती शाळेच्या कागदपत्रात नमूद केलेली आहे. मात्र सदरची

जन्मतारीख शाळेच्या कागदपत्रात नमूद करताना पिडीतेच्या जन्माचा दाखला, तिच्या पालकांनी दिलेला नव्हता. तसेच सा.क्र.८ हे त्यांच्या वैद्यकीय अहवालामध्ये उल्लेखित घटनेच्या वेळी पिडीता ही १४ ते १७ या वयोगटातील असावी असे सांगितलेले आहे. परंतू जर error of margin या तत्वानुसार पिडीतेच्या वयाबाबत अगोदर दोन ते तीन वर्ष व नंतर दोन ते तीन वर्ष हे तत्व विचाराधीन घेतले तर पिडीतेचे वय उल्लेखित घटनेच्या वेळी १७ किंवा २० असू शकते असा निष्कर्ष निघतो. म्हणून मी या उपरोक्त उल्लेखलेल्या पाचही साक्षीदारांच्या सरतपासणीमधून जे काय दस्ताऐवज म्हणजे निशाणी ७१, निशाणी ७२, निशाणी ७३, निशाणी ७४, निशाणी ७५, निशाणी ७८, निशाणी ८४, निशाणी ८५, निशाणी ८६, निशाणी ८७, निशाणी १०० ते १०२ आणि निशाणी पी२, निशाणी पी३ हे जे दस्ताऐवज वय सिध्द करण्याच्या दृष्टीने सिध्द केल्याचा अभियोग पक्ष दावा करीत आहे, ते दस्ताऐवज अभियोग पक्षास पिडीता ही उल्लेखित घटनेच्या वेळी अज्ञान म्हणजे १८ वर्षाच्या आत होती, हे सिध्द करण्याच्या दृष्टीने उपयुक्त नाही असे माझे मत आहे. कारण सा.क्र.७ हा असे कबूल करतो की, इयत्ता पहिलीच्या वर्गात प्रवेश हा सहा वर्षानंतर दिला जात होता. तसेच पहिलीच्या वर्गात प्रवेश घेताना जन्मप्रमाणपत्र देणे आवश्यक असते. परंतू सा.क्र.७ च्या शाळेत पिडीतेचे कोणतेही जन्मप्रमाणपत्र उपलब्ध नाही. म्हणून सा.क्र.७ यास पिडीतेची जन्मतारीख कशाच्या आधारे नोंदवली हे सांगता येत नाही. तसेच ती जन्मतारीख खरी असल्याचेही सांगता येत नाही. त्यानंतर वैद्यकीय अधिकारी सा.क्र.८ असे कबूल करतात की, दोन व्यक्तींच्या हाडांच्या लांबीनुसार त्यांचे वय एकसारखे असू शकते. त्यानंतर सा.क्र.९ असे कबूल करतात की, पिडीतेने त्यांच्या शाळेत प्रवेश घेतला त्यावेळी ते त्या शाळेत कार्यरत नव्हते. तसेच पिडीतेने प्रवेश घेतला त्यावेळी

तिच्या जन्माचा दाखला दिलेला नव्हता. म्हणून तिची जन्मतारीख पूर्वीच्या शाळेत जी आहे तीच नोंदवली आहे. सा.क्र.१२ असे कबूल करतात की, पिडीता ही इयत्ता पहिलीच्या वर्गात त्यांच्या शाळेत शिकलेली नाही आणि या साक्षीदाराने अंगणवाडीकडून जी काय मुलांची यादी येते ती पाहिलेली नाही. पिडीतेचा जन्म हा गौडगांव येथील आहे. पिडीतेच्या जन्माचा दाखला या साक्षीदाराकडे नाही आणि जन्मदाखला पाहिल्याशिवाय हा साक्षीदार निश्चित अशी जन्मतारीख सांगू शकत नाही. त्यानंतर सा.क्र.१४ जो नगर परिषदेचा कर्मचारी आहे, तो असे कबूल करतो की, पिडीतेच्या जन्मा संदर्भात ज्या नोंदी झाल्या आहेत, त्या त्याच्या कार्यकाळात झालेल्या नाहीत. तसेच निशाणी पी४ नुसार असणा–या दस्ताऐवजांवर उप जिल्हा रुग्णालय उमरगा यांनी ते दस्ताऐवज तयार केलयाबाबतचे व ती माहिती कळवल्याबाबतची त्या उप जिल्हा रुग्णालयाची नोंद नाही. तसेच त्या दवाखान्याचा शिक्का व संबंधित अधिका–याची सही त्या निशाणी पी ४ वर कोठेही नाही. तसेच हा साक्षीदार पिडीतेची जन्मतारीख ०६.०५.२०१० असल्याचे सांगत आहे.

२७. अशा प्रकारे उपरोक्त उल्लेखलेल्या या अभियोग पक्षाच्या पिडीतेच्या वय निश्चितीबाबतच्या पाचही साक्षीदारांच्या सरतपासणी, उलट तपासणी आणि त्यांनी दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता पिडीतेच्या जन्माचा दाखला या न्यायालयासमोर न आल्याने आणि पिडीतेचा जन्म हा उप जिल्हा रुगणालय उमरगा येथे झाला, तेथील विश्वासग्राहय दस्ताऐवज न्यायालयासमोर न आल्यामुळे हे न्यायालय उल्लेखित घटनेच्या वेळी पिडीता ही अज्ञान होती, म्हणजेच तिचे वय १८ वर्षाच्या आत होते असा निष्कर्ष काढण्यास असमर्थ आहे. म्हणून या पाचही साक्षीदारांचा तोंडी पुरावा अभियोग पक्षास पिडीतेचे वय सिध्द करण्याच्या उद्देशान उपयुक्त नाही असे माझे मत आहे.

२८. त्यानंतर सा.क्र.१० म्हणून ज्या साक्षीदाराची साक्ष निशाणी ९०

नुसार नोंदवली आहे, ते पिडीतेच्या कपडे जप्तीच्या पंचनाम्यातील पंच आहेत. हा साक्षीदार त्याचे सरतपासणीमध्ये पिडीतेचे जे काय कपडे जप्त केलेले आहेत, त्या कपडयांचे वर्णन सविस्तरपणे सांगत असून ते कपडे त्याचे उपस्थितीत जप्त करुन तसा जप्ती पंचनामा केल्याचेही सांगत आहे. त्या पंचनाम्यावर त्याची सही असल्याचे सांगत आहे. सदरचा पंचनामा निशाणी ९१ नुसार आहे. सदर साक्षीदाराच्या उलट तपासाचे अवलोकन केले असता या साक्षीदाराने पंचनाम्याला जाण्यासाठी त्याचे मुख्याध्यापकांची / वरिष्ठांची लेखी परवानगी घेतली होती, याबाबतचा दस्ताऐवज दाखल केलेला नाही. पोलीस अधिकारी सुर्वे यांनी या साक्षीदारास पंचनाम्यासाठी हजर रहा अशी नोटीस दिली नव्हती. या साक्षीदारास ज्या कुलकर्णी नावाच्या महिला सदर ठिकाणी हजर होत्या, त्यांचे पूर्णनांव आणि पत्ता माहित नहाी. तसेच पिडीतेचे कपडे कोठून आणले होते, तेही माहित नाही. या साक्षीदारास पिडीतेचे नावही माहित नाही. तसेच सदरचा जप्ती पंचनामा कोणत्या नंबरच्या गुन्हयात केला होता, याबाबतही माहित नाही. अशा प्रकारे या साक्षीदाराच्या उपरोक्त उल्लेखलेल्या कबुली कथनांवरुन हा साक्षीदार पिडीतेच्या कपडे जप्तीच्या पंचनाम्यातील पंच आहे किंवा काय, याबाबत संशय उत्पन्न होतो.

२९. त्यानंतर सा.क्र.११ म्हणून ज्या साक्षीदाराची साक्ष निशाणी ९४ नुसार नोंदवली आहे, तो पोलीस कर्मचारी असून हा साक्षीदार आरोपी याच्या भ्रमणध्वनीचे लोकेशनचा शोध घेण्यासाठी रत्नागिरी येथे त्याच्या वरिष्ठाच्या आदेशाप्रमाणे ०९.१२.२०२० रोजी तो, पिडीतेची आई आणि त्याचा सहकारी कुंभार असे गेल्याचे सांगत आहे व त्याठिकाणी आरोपीच्या भ्रमणध्वनीचे लोकेशन शोधून ते आरोपीच्या मौजे उक्षी या गावी गेले होते. त्याठिकाणी पिडीता आणि आरोपी हे मिळून आल्यानंतर त्यांना देवरुख पोलीस ठाण्यात आणले आणि तेथून

उस्मानाबाद पोलीस ठाण्यात आणल्याचे सांगत आहे. मात्र हा साक्षीदार त्याचे उलट तपासात अशी साक्ष देतो की, ०९.१२.२०२० ला कोव्हीड – १९ चा प्रादूर्भाव असल्यामुळे लॉकडाऊन होते. या साक्षीदाराने त्याचा या गुन्हयाचे तपासी अधिकारी यांनी जो काय जबाब घेतलेला आहे, त्या जबाबात तो, त्याचा सहकारी आणि पिडीतेची आई असे मौजे उक्षी या गावी केले होते असे सांगितलेले नाही. अशा प्रकारे या साक्षीदाराचा तोंडी पुरावा हा अभियोग पक्षास आरोपीवर ठेवलेले दोषारोप सिध्द करण्यास उपयुक्त नाही असे माझे मत आहे, कारण बचाव पक्ष पिडीता व आरोपी हे मौजे उक्षी येथे मिळून आलेले नाहीत असे कोठेही म्हणत नाहीत.

३०. त्यानंतर सा.क्र.१३ म्हणून ज्या साक्षीदाराची निशाणी ११४ नुसार नोंदवली आहे, ती पिडीतेची मामी आहे. ही साक्षीदार तिच्या सरतपासणीत असे सांगते की, नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवडयात पिडीता तिच्याकडे राहण्यासाठी आली होती. त्यावेळी पिडीता तिला तिचा भ्रमणध्वनी कायम मागायची. दिनांक ०७.१२.२०२० रोजी सायंकाळी ६.३० वाजता पिडीता ही बाथरुमला जाते म्हणून गेली ती परत आली नाही. त्यानंतर या साक्षीदाराने तिचे पतीस पिडीतेबद्दल सांगितले, त्याने तिचा शोध घेतला, परंतू ती मिळून आली नाही. ही साक्षीदार उलट तपासात असे कबूल करते की, पिडीतेच्या आरोपीसोबतच्या प्रेमसंबंधाची माहिती तिच्या आईवडिलांना समजल्यामुळे या साक्षीदाराचे घरी राहण्यासाठी आणले होते. या साक्षीदाराची साक्ष ही अभियोग पक्षास आरोपीने पिडीतेस फूस लावून पळवून नेले आणि तिचे बरोबर जबरदस्तीने शारिरीक संबंध प्रस्थापित केले हे सिध्द करण्याच्या दृष्टीने उपयुक्त नाही, असेच दिसून येते. कारण ही साक्षीदार पिडीता व आरोपी यांच्यातील शारिरीक संबंधाबाबत तिला पिडीतेने काही सांगितल्याचे सांगत नाही.

३१. शेवटी अभियोग पक्षाने सा.क्र.१५ म्हणून निशाणी १२९ नुसार ज्या

साक्षीदाराची साक्ष नोंदवली आहे, ते या गुन्हयाचे तपासी अधिकारी आहेत. हा साक्षीदार त्याचे सरतपासणीत त्यांनी या गुन्हयाचा तपास करताना जो काय पत्रव्यवहार केला, साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवले, तसेच घटनास्थळाचे पंचनामे, पिडीता व आरोपी यांच्या कपडयाचे जप्ती पंचनामे, त्यांना वैद्यकीय तपासणीसाठी पाठवण्याबाबत, तसेच महत्वाच्या साक्षीदारांना फौ.प्र.संहिता कलम १६४ चा जबाब देण्यासाठी संबंधित न्यायालयासमोर जाण्याबाबत जो काही पत्रव्यवहार केलेला आहे, त्या पत्रव्यवहारास सहाय्यभूत ठरेल अशी साक्ष देत आहे. या साक्षीदाराचे पूर्ण तपासांती असे त्याचे मत आहे की, आरोपी याने पिडीतेस फूस लावून पळवून नेले आणि तिचे सोबत तिचे इच्छेविरुध्द जबरदस्तीने शारिरीक संबंध प्रस्थापित केले. मात्र अभियोग पक्षाने उपरोक्त उल्लेखलेला जो काय तोंडी पुरावा न्यायालयासमोर नोंदवलेला आहे, त्या साक्षीदाराच्या तोंडी पुराव्यानुसार आरोपी याने पिडीतेस फूस लावून पळवून नेल्याचे आणि तिच्यावर जबरी शारिरीक संबंध प्रस्थापित केल्याचे दिसून येत नाही.

३२. या साक्षीदाराच्या उलट तपासाचे अवलोकन केले असता ते असे कबूल करतात की, फिर्यादीने तिचा जो काय जबाब दिला आहे, त्यामध्ये पिडीता ही मौजे माडज, ता. उमरगा येथे गेल्याचे सांगितले. निशाणी ४७ च्या कबुली निवेदना व्यतिरिक्त आरोपीचे दुसरे कोणतेही कबुली निवेदन केलेले नाही. या साक्षीदाराने जे काय घटनास्थळाचे तीन पंचनामे केल्याचे तपासात दाखवले आहे, त्या घटनास्थळांच्या जागेच्या मालकीबाबत कोणताही दस्ताऐवज हस्तगत केलेला नाही. तसेच पिडीता आणि फिर्यादी यांनी त्यांचे निशाणी ४० व निशाणी ५२ नुसार असणा–या फौ.प्र.सं. कलम १६४ च्या जबाबात वडगांवच्या घटनेबाबत काही एक सांगितलेले नाही. अशा प्रकारे सा.क्र.१५ ची साक्ष जरी अभियोग पक्षास या

गुन्हयाचा तपास करणा–या तपासी अधिका–याने जो तपास केलेला आहे, तो सिध्द करण्यास उपयुकत असली तरी सुध्दा या साक्षीदाराच्या साक्षीवरुन मी आरोपी याने पिडीतेस फूस लावून पळवून नेले होते आणि तिचेसोबत जबरी शारिरीक संबंध प्रस्थापित केले असा मी निष्कर्ष काढण्यास असमर्थ आहे. कारण पिडीता स्वतःच ती आरोपीसमवेत तिच्या स्वमर्जीने गेल्याचे आणि त्यांचेत ०७.१२.२०२० पूर्वी व त्यानंतरही जे काय शारिरीक संबंध आलेले आहेत, ते प्रेमसंबंधातून आल्याचे सांगत आहे. पिडीता ही उल्लेखित घटनेच्या वेळी जरी अज्ञान असली तरी सुध्दा तिचे वय निश्चितीच्या दृष्टीने तिच्या जन्माचा दाखला न्यायालयासमोर आलेला नाही. तसेच तिला उल्लेखित घटनेच्या वेळी बेकायदेशीररित्या शारिरीक संबंध प्रस्थापित केल्यानंतर त्याचे काय दुष्परिणाम होतात याची जाणीव / आकलन असल्याचे दिसून येते. म्हणजेच त्यावेळी तिचे वय हे १७ असल्याचे वैद्यकीय अधिकारी यांनी सांगितलेले आहे. म्हणून मी या सा.क्र.१५ यांची साक्ष, आरोपीवर ठेवलेले दोषारोप सिध्द करण्यास उपयुक्त नाही असाच निष्कर्ष काढत आहे.

३३. त्यानंतर या प्रकरणात अभियोग पक्षाने उपरोक्त उल्लेखलेल्या साक्षीदारांचा तोंडी पुरावा न्यायालयासमोर नोंदवताना जो काय कागदोपत्री पुरावा म्हणजेच फिर्यादीची फिर्याद, तिचा फौ.प्र.सं. कलम १६४ चा जबाब, पिडीतेचा जबाब, तिचा १६४ चा जबाब, तिन्ही घटनास्थळांचे पंचनामे, पिडीता व आरोपी यांच्या कपडे जप्तीचे पंचनामे, त्यांचे वैद्यकीय तपासणीचे अहवाल, पिडीतेच्या वय निश्चितीबाबतचे उपरोक्त उल्लेखलेले तिच्या शाळेतील दस्ताऐवज तसेच इतर जो कागदोपत्री पुरावा निशाण्या देवून न्यायालयासमोर सिध्द केलेला आहे असा दावा केलेला आहे. तो कागदोपत्री पुरावा अभियोग पक्षास आरोपीवर ठेवलेले दोषारोप सिध्द करण्यास उपयुक्त नाही असे माझे मत आहे. कारण पिडीता स्वतः तिचेत व

आरोपी मध्ये प्रेमसंबंध होते व त्या प्रेमसंबंधातूनच ती तिच्या स्वतःच्या मर्जीने ०७.१२.२०२० रोजी आरोपीसोबत गेल्याचे तसेच त्यांच्यात जे काय तथाकथित शारिरीक संबंध आलेले होते, ते आरोपीने जबरदस्तीने प्रस्थापित केले असे ती कोठेही सांगत नाही. तसेच या प्रकरणात प्रथम शारिरीक संबंधाची घटना ही नेमकी केव्हा घडली व त्यानंतरचेही शारिरीक संबंध नेमक्या कोणत्या तारखेस झालेले आहेत, याबाबत पिडीतेने तसेच इतर कोणत्याही अभियोग पक्षाच्या साक्षीदाराने निश्चित अशी तारीख, महिना व वर्षे सांगितलेले नाही. त्याचप्रमाणे वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांच्या अहवालात पिडीता हिने सदरचे शारिरीक संबंध झाल्यानंतर स्नान व लघवी केल्याचे मान्य केल्यामुळे आरोपीने तिच्याबरोबर शारिरीक संबंध केलेले आहेत असा निश्चित असा निष्कर्ष नोंदवलेला नाही. फक्त पिडीता हिचेबरोबर शारिरीक संबंध झाले असावे अशी शक्यता नाकारता येत नाही असे सांगितले आहे. म्हणून या वैद्यकीय अधिका–याच्या निष्कर्षावरुन आरोपीस त्यावर ठेवलेल्या दोषारोपासाठी दोषी धरणे न्याय व योग्य होणार नाही.

३४. त्याचप्रमाणे या प्रकरणात जे काय पृथःकरण अहवाल पिडीता व आरोपी यांच्या कपडे जप्तीवरुन आणि त्यांच्या घेतलेल्या वेगवेगळया प्रकारच्या नमुन्यांबाबत आलेले आहेत. त्या पृथःकरण अहवालावरुनही पिडीता व आरोपी यांच्यामध्ये शारिरीक संबंध झाल्याचे निष्पन्न झालेले नाही. येणे प्रमाणे उपरोक्त उल्लेखलेला कागदोपत्री पुरावा अभियोग पक्षास आरोपीवर ठेवलेले दोषारोप सिध्द करण्यास उपयुक्त नाही असे माझे मत आहे.

३५. अशा प्रकारे उपरोक्त उल्लेखलेल्या कारणमिमांसेस आधीन राहून मी अभियोग पक्षाने आरोपीवर ज्या भारतीय दंड विधान आणि लहान मुलांचे लैंगिक शोषणापासून संरक्षणाच्या कायद्यांतर्गत ज्या कलमांखाली दोषारोप ठेवलेले आहे, ते

विना संशयविरहित सिध्द न केल्यामुळे माझा निष्कर्ष वादप्रश्न क्रमांक १ ते ६ वर नकारार्थी नोंदवित आहे.

**वादप्रश्न क्रमांक ७ –**

३६. वरील विवेचनावरुन हे स्पष्ट होते की, फिर्यादी पक्ष आरोपींविरुध्दचे दोषारोप शाबीत करु शकले नाहीत. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. या निष्कर्षावरुन मी खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करतो.

## आदेश

१. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५ (१) अन्वये आरोपी संजय रविंद्र चव्हाण याची भारतीय दंड संहिता कलम ३६३, ३६६ (अ), ३७६ (२) (एन), ३७६ (३) आणि लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ कलम ४ व ६ या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. जप्त केलेला मुद्देमाल मूल्यहिन असल्यामुळे अपिल कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावा.

३. आरोपीचे जातमुचलके रद्द करण्यात येतात.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ नुसार आरोपीने रक्कम रुपये २५,०००/– चा जातमुचलका व तेवढयाच रकमेचा जामीन दयावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SHANKAR GANPATRAO THUBE
Date: 2026.07.16 18:09:43 +0530

दिनांक – १६.०७.२०२६ (एस. जी. ठुबे)

न्यायाधीश, जलदगती विशेष न्यायालय,

धाराशिव.

## C E R T I F I C A T E

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment. | | |
| Name of Stenographer | - | Mahesh Abhimanyu Pawar<br>Stenographer Grade -I |
| Court | - | Fast Track Special Court,<br>Dharashiv (Osmanabad) |
| Date of order/Judgment | - | 16.07.2026 |
| Date of order/judgment signed by presiding officer. | - | 16.07.2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 16.07.2026 |